| | |
|---|---|
| सत्यमेव जयते | **विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ,नागपुर** |
| | **अधिक्षक अभियंता, वाशिम पाटबंधारे मंडळ, वाशिम** |
| | **प्रवाह बिल्डिंग, सिव्हिल लाईन वाशिम.** |
| | Ph. No. ०७२१-२६६२८१९ / Fax. No. २६६२८१६ |
| | **Email ID :** sewicwashim@rediffmail.com, |


सेवानिवृत्त अभियंता यांच्या सेवा विविध कामाकरीता करार पध्दतीने विवक्षित कामासाठी नेमणूक करण्याबाबत. महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. संकीर्ण- २७१५ / प्र.क्र. १०० / १३ मंत्रालय, मुंबई ४०००३२ दि. १७/१२/२०१६ अनुसार **वाशिम पाटबंधारे मंडळ, वाशिम.** या कार्यालयालयांतर्गत **फक्त जलसंपदा विभागातील सेवानिवृत्त अभियंता** यांची विवक्षीत कामासाठी करार पद्धतीने एक वर्षासाठी कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) या पदावर नेमणूक करावयाची आहे. अर्जदार सेवानिवृत्त अभियंता यांना सिंचन व बांधकाम प्रकारचे ज्ञान व पुरेसा अनुभव असणे आवश्यक आहे. ईच्छुक अर्जदारांनी विहीत नमुन्यातील अर्ज **अधीक्षक अभियंता, वाशिम पाटबंधारे मंडळ, वाशिम प्रवाह बिल्डिंग, सिव्हिल लाईन वाशिम.-४४४५०५** यांच्याकडे **दिनांक-३१/१२/२०२१ सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत** (सुटटीचे दिवस वगळून) प्राप्त होईल. याप्रमाणे पोस्टाद्वारे सादर करावीत किंवा प्रत्यक्ष द्यावीत. नियोजित दिनांकानंतर प्राप्त झालेल्या अर्जाचा विचार करण्यात येणार नाही. सदर नेमणूका समितीच्या मुलाखतीद्वारे करण्यात येतील. सदर नेमणुकांचे आदेश हे शासनाच्या अंतिम मान्यतेनंतरच निर्गमीत करण्यात येतील. करार पद्धतीवर भरावयाचा पदाचा तपशील खालीलप्रमाणे.

| **अ.क्र.** | **संवर्ग** | **विवक्षित कामाचा तपशील** | **जलसंपदा विभागातून खालील पदावरून सेवानिवृत्त झालेले अभियंता सदर पदांकरिता अर्ज करण्यास पात्र राहील.** | **एकूण भरावयाची पदे** |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | कनिष्ठ अभियंता | सिंचन / बांधकामाधीन प्रकल्पांची कामे | सेवा निवत्त कनिष्ठ अभियंता / शाखा अभियंता / सहा अभि.श्रेणी-२ | ०५ |

सदर नेमणुकिकरिता लागू असलेल्या अटी व शर्ती तसेच अर्जाचा नमुना हा **http://wrd.maharashtra.gov.in** या वेबसाईटवर उपलब्ध आहे. तसेच हा अर्ज व अटी / शर्ती, **अधीक्षक अभियंता, वाशिम पाटबंधारे मंडळ, वाशिम प्रवाह बिल्डिंग, सिव्हिल लाईन वाशिम.** या कार्यालयात शासकीय सुटटीचे दिवस वगळता उपलब्ध आहे.

(भा.वि.वळवी)
सदस्य सचिव तथा
सहा.अधिक्षक अभियंता
वाशिम पाटबंधारे मंडळ,
वाशिम.

Scanned by CamScanner

# विहित नमुन्यातील अर्ज

## जलसंपदा विभागातील सेवानिवृत्त अभियंता यांच्या सेवा विविध कामाकरीता करार पध्दतीने विवक्षित कामासाठी घेणेबाबतचा अर्ज

प्रति,

मा.अधीक्षक अभियंता
वाशिम पाटबंधारे मंडळ, वाशिम,
प्रवाह बिल्डिंग, सिव्हील लाईन, वाशिम.
पिन-४४४५०५

| उमेदवाराने अलिकडील काळातील स्वत:चे छायाचित्र चिकटवावे |
|---|

अर्ज केलेल्या पदाचे नाव------------------------------------------------

| | | |
|---|---|---|
| १ | अर्जदाराचे नाव | - |
| २ | कायमचा पत्ता | - |
| ३ | दुरध्वनी क्रमांक /भ्रमणध्वीसह (अनिवार्य) | - |
| ४ | ई-मेल (अनिवार्य) | - |
| ५ | सध्याचा पत्ता | - |
| ६ | जन्मतारीख | - |
| ७ | राष्ट्रीयत्व | - |
| ८ | प्रवर्ग | - |
| ९ | लिंग | पुरुष/ महिला |
| १० | अवगत भाषा | - |

**११ शैक्षणिक माहिती -**

| अ.क्र. | परिक्षा | वर्ष | विषय | शाळा/कॉलेजचे नाव | बोर्ड/ विद्यापिठ | मिळालेल्या गुणाची टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | | | | | | |
| २ | | | | | | |
| ३ | | | | | | |



Scanned by CamScanner

१२ इतर शैक्षणीक माहिती (संगणक इत्यादी)-

| अ.क्र. | अभ्यासक्रम | वर्ष | संस्थेचे (प्रायोजक)नांव | मिळालेल्या गुणांची टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| १ | | | | |
| २ | | | | |
| ३ | | | | |

१३ अनुभव –

| अ.क्र. | हुद्दा व वेतन | कार्यालयाचे नाव व पत्ता | कालावधी | कामाचा अनुभव (विस्तृत स्वरुपात) |
|---|---|---|---|---|
| १ | | | | |
| २ | | | | |
| ३ | | | | |

**१४ :- सेवानिवृत्तीचा दिनांक :-**

**१५ :- सद्य:स्थितीत कुठे काम करीत असल्यास तपशिल-**

मला पुर्णपणे माहिती आहे की, सेवानिवृत्त अभियंता यांच्या सेवा करार पध्दतीने विवक्षित कामासाठी कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) पदाकरीता उमेदवारांची नियुक्ती करण्यात येणार आहे. सदर पदे प्रकल्पाचे कार्यालयीन कामासाठी १ वर्षाकरीता आहे व कामाचे व्याप्ती प्रमाणे कमी / अधिक करण्यात येतील. कामाच्या निकडीनुसार वाशिम जिल्हयातील कोणत्याही तालुक्यात माझी काम करण्याची तयारी आहे.

मी सत्य प्रतिज्ञेवर कथन करतो की, माझे माहिती प्रमाणे वर दिलेल्या तपशिल सत्य व अचुक आहे यामध्ये काही चुकीची माहिती आढळल्यास माझी निवड कोणत्याही क्षणी पुर्ण सुचना शिवाय रद्द होईल व मी शिक्षेस पात्र ठरेल याची मला पुर्ण जाणिव आहे.

ठिकाण-

अर्जदाराची सही

दिनांक-



Scanned by CamScanner

**सदर नेमणुका ह्या खाली सर्वसाधारण शर्ती व अटीच्या अधिन राहतील.**

१) करारपद्धतीवर नेमणूकीकरिता अर्ज करते वेळी सेवानिवृत्त अभियंता यांचे वय दिनांक ०१/१२/२०२१ रोजी ७० वर्षेपेक्षा अधिक नसावे.

२) अर्ज करणाऱ्या सेवानिवृत्त अभियंता ज्या पदासाठी अर्ज केले आहे. त्या पदाचा किमान तीन वर्षाचा अनुभव असणे आवश्यक आहे.

३) अर्ज करणाऱ्या सेवानिवृत्त अभियंता विरुद्ध कोणत्याही प्रकारची विभागीय चौकशी व न्यायालयीन प्रकरण नसावी याबाबत अर्जदारांनी ज्या कार्यालयातून सेवानिवृत्त झाले आहे, त्या संबंधीत कार्यालयाकडुन तसे प्रमाणपत्र घेण्यात यावे.

४) करारपद्धतीने नियुक्ती देण्यात आल्यामुळे संबंधीतास शासनाच्या कोणत्याही संवर्गात सेवा समावेशनाबाबत किंवा सामावून घेण्याबाबत वा नियमित सेवेचा इतर कोणतेही लाभ मिळण्याचा अधिकार नसेल याबाबत अर्जदाराने रु. १००/- च्या स्टॅम्पवर प्रतिज्ञालेख देण्यात यावा.

५) नियुक्त अर्जदाराला त्यानी विहीत कार्यपालन केल्यामुळे महाराष्ट्र शासन निर्णय क्र. संकीर्ण - २७१५ / प्र. क्र. १००/१३ दि. ०८.०१.२०१६ मधील अटी व शर्तीप्रमाणे त्यांना सेवानिवृत्तीपूर्वी मिळत असलेल्या एकूण वेतनातून (मूळ वेतन व महागाई भत्ता धरून) त्यांना आता मिळत असलेले एकूण निवृत्ती वेतन (महागाई भत्ता आणि अंशराशीकृत निवृत्तीसह) वजा केल्यानंतर होणारी रक्कम मासिक परिश्रमिक म्हणून त्यांना अनुज्ञेय राहील त्याची कमाल मर्यादा रु. ४०,०००/-(अक्षरी रूपये :- चाळीस हजार फक्त) पर्यंत राहील,

६) करार पद्धतीने नियुक्त झालेल्या अर्जदारास आवश्यक प्रसंगी दौरा करावा लागल्यास त्यांना त्यांच्या निवृत्तीच्या वेळच्या वेतनमानास अनुसरुन प्रवास भत्ता व दैनीक भत्ता अनुज्ञेय राहील,

७) नियुक्त प्राधिकारी (अधीक्षक अभियंता) यांना विशेष परिस्थितीत कोणत्याही वेळी करार पद्धतीवरील सेवा समाप्त करण्याचे अधिकारी राहील.

८) करार पद्धतीने नियुक्त झालेल्या अर्जदारास नेमून दिलेले काम समाधानकारक नसल्यास कोणतेही सबळ कारण न देता त्यांची सेवा समाप्त करण्यात येईल.

९) क्षेत्रीय स्तरावर करार पद्धतीने नियुक्त झालेल्या अर्जदारास सेवा काळामध्ये काही नैसर्गिक अपघात व काही आजार उद्धवल्यास कार्यालय / शासन बाधील राहणार नाही.

१०) करार पद्धतीने नियुक्त झालेल्या अर्जदारास नेमणूक दिलेली कामे पूर्ण करण्याची जबाबदारी संबंधीत व्यक्तीची राहील व तसे हमीपत्र त्यांच्याकडून घेण्यात येईल.

११) अर्ज करतवळी सेवानिवृत्त अभियंता यांनी त्याचे कुटुंब निवत्ती वेतन मंजुरीचे महालेखापाल कार्यालयाचे आवश्यक दस्ताऐवज सादर करावेत

१२) करार पद्धतीने नियुक्त झालेल्या अर्जदाराने नियुक्तीच्या ठिकाणी नियुक्ती आदेश निर्गमित झालेल्या दिनांकापासून १५ दिवसाचे आत रुजूहोणे बंधनकारक राहील, अन्यथा सदर नियुक्त आपोआपप संपुष्ठात येईल.

१३) सदर नेमणूक ०१ वर्षांच्या पुढे वाढविण्याची आवश्यकता भासल्यास नियुक्ती अधिकारी तसा निर्णय घेऊ शकतात.

१४) मुलाखतीकरिता पात्र उमेदवारांना पत्र ईमेद्वारे पाठविण्यात येईल व भ्रमणध्वनीवर लघु संदेशाद्वारे कळविण्यात येईल. यास्तव अर्जदारांनी आपल्या वैयक्तिक माहितीत त्यांचा ईमेल पत्ता व भ्रमणध्वनी क्रमांक देणे बंधनकारक आहे. तसेच मुलाखतीसाठी पात्र उमेदवारांची यादी अधीक्षक अभियंता, वाशिम पाटबंधारे मंडळ, वाशिम व कार्यकारी अभियंता, वाशिम पाटबंधारे विभाग, वाशिम , कार्यकारी अभियंता, लघु पाटबंधारे विभाग ,कारंजा / कार्यकारी अभियंता, लघु पाटबंधारे विभाग वाशिम (बांध) यांचे सूचना फलकावर प्रसिद्ध करण्यात येईल व अंतीम निवड झालेल्या अर्जदाराची यादी वरील कार्यालयाच्या नोटीस बोर्डवर प्रसिद्ध करण्यात येईल. तसेच अंतीम निवड झालेल्या अर्जदारांना वैयक्तीक ई-मेल कळविण्यात येईल. उपरोक्त ०१ ते १४ अटी व शर्ती मला मान्य आहेत ह्या बाबतचे अर्जदाराने रु. १००/- च्या स्टॅम्प पेपरवर बंधपत्र देणे बंधनकारक राहील.

१५) सदर नियुक्ती आवश्यक सिंचन व बांधकाम कामासाठी करण्यात येत असून त्यासाठी योग्य उमेदवार न भेटल्यास काही किंवा पदे रिक्त ठेवण्याचा अधिकार समितीस आहे.



Scanned by CamScanner